महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या उपविधी नियम (Bye-laws) ला मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : ०४.१५/प्र.क्र.१०६/अ/फ-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २८ जानेवारी, २०१६.

वाचा :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी :- १००२/प्र.क्र.५३/फ-१, दिनांक २०.०२.२००८.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी :- ०४.१५/प्र.क्र.१०६/फ-१, दिनांक ०८.१२.२०१५.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ" एका संस्थेच्या रुपाने संस्थांची नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत स्थापन करण्यास व नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मंडळाचे नियामक मंडळ (Governing Council), कार्यकारी समिती (Execuitve Commottee) यांच्या उपविधी नियम (Bye-laws) वेगळयाने आदेश जारी करण्यात येतील असेही सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

**शासन निर्णय :-**

सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे नियामक मंडळ (Governing Council), कार्यकारी समितीच्या (Execuitve Commottee) उपविधी नियमांना सोबतच्या सहपत्रानुसार (Bye-laws) शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२९१६१०३०२४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APTE ARVIND SHANKAR

Digitally signed by APTE ARVIND SHANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT,CID - 918010, postalCode=400032, st=Maharashtra, cn=APTE ARVIND SHANKAR
Date: 2016.01.29 16:16:52 +05'30'

**( अरविंद आपटे )**
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

**प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, पर्यावरण विभाग,मंत्रालय , मुंबई
७) सचिव ( शालेय शिक्षण व क्रिडा), मंत्रालय, मुंबई.
८) सचिव आदिवासी विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
१३) महा संचालक व प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( अर्थसंकल्प, नियोजन व विकास ), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन ), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई (बोरीवली)/नाशिक.
१७) विभागीय आयुक्त, ( सर्व महसूल विभाग ).
१८) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१९) आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे.
२०) संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
२१) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
२२) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे/कोल्हापूर/नाशिक.
२३) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
२४) मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली.
२५) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व बोर व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
२६) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
२७) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
२८) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
२९) वनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे.
३०) सर्व जिल्हाधिकारी.
३१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
३२) सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.
३३) उपसंचालक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
३४) कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर).
३५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, पर्यटन विकास महामंडळ.
३६) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
३७) प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, पर्यटन विकास महामंडळ.

३८) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.

३९) उपवनसंरक्षक (वन्यजीव), अकोला/औरंगाबाद.

४०) विभागीय वन अधिकारी सांगली/उस्मानाबाद/बीड / हिंगोली /चिपळूण.

४१) उप विभागीय वन अधिकारी संगमनेर/मालेगाव/ भोर.

४२) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी.

४३) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य , मुंबई / नागपूर.

४४) वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.

४५) वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४६) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

**शासन निर्णय क्रमांक ०४.१५/प्र.क्र.१०६/अ/फ-१, दिनांक :- २८ जानेवारी, २०१६ सोबतचे प्रपत्र**

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ**

(नोंदणी क्र-)

## उपविधि (By-laws)

**१. व्याख्या :-**

या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

i) "अधिनियम" याचा अर्थ संस्थाची नोंदणी अधिनियम, १८६० असा आहे.

ii) "नियम" याचा अर्थ महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची उपविधी असा आहे.

iii) "मंडळ" याचा अर्थ त्या अधिनियमा खाली स्थापन केलेले महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ असा आहे.

iv) "नियामक मंडळ (General Council)" याचा अर्थ या उपविधीचे क्र ३ व ५ अंतर्गत स्थापन केलेले नियामक मंडळ असा आहे.

v) "कार्यकारी समिती (Executive Committee)" याचा अर्थ या उपविधीचे क्र ३ व ११ अंतर्गत स्थापन केलेली समिती असा आहे.

vi) "समिती प्रमुख" याचा अर्थ कार्यकारी समितीचा अध्यक्ष/प्रमुख असा आहे.

vii) "अध्यक्ष" याचा अर्थ नियामक मंडळाचा अध्यक्ष असा आहे.

viii) " व्यवस्थापकीय संचालक" याचा अर्थ या उपविधीचे कलम १३(अ) नुसार नियुक्त केलेल्या मंडळाचा व्यवस्थापकीय संचालक असा आहे.

ix) "सदस्य" याचा अर्थ मंडळाचे नियामक मंडळाचा सदस्य असा आहे.

x) "राज्य शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

**२. मंडळाची सर्वसाधारण कार्य :-**

महाराष्ट्र शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाप्रमाणे निसर्ग संवर्धन, निसर्ग शिक्षण व स्थानिक लोकांचे राहणीमान उंचावणे संबंधी योजना राज्य शासन/ केंद्र व इतर राज्याचे विभाग, शासकीय/अशासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था/आंतरराष्ट्रीय संस्था मार्फत प्रभावीपणे अंमलबजावणी करणे मंडळाचे सर्वसाधारण कार्य राहील. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

i) महाराष्ट्र राज्यात निसर्ग पर्यटन धोरण प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी केंद्रस्थ यंत्रणा म्हणून काम करणे.

ii) निसर्ग पर्यटन विषयासंबंधी शासकीय धोरण, कायदा वा कार्यपध्दती सुसंगत करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणे.

iii) निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी सर्व भागिदारांमध्ये परस्पर हितवाहक (Symbiotic) संबंधास प्रोत्साहन देणे.

iv) भागिदारांच्या क्षमता बांधणी करणे.

v) निसर्ग संवर्धन, निसर्ग शिक्षण व स्थानिक लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी उपलब्ध संसाधनांचा उपयुक्त वापर होणेसाठी प्रमाणीकरण/संनियंत्रण/इम्पॅक्ट असेसमेंट व नियमन संबंधी उपाययोजना करणे.

vi) निसर्ग पर्यटन स्थळाची निवड व उपयुक्त साधनसामुग्रीचा विकास करणे तसेच त्यांची वर्गवारी प्रचलित मापदंडानुसार करणे.

vii) महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, माहिती व जनसंपर्क विभाग यांचे संयुक्त विद्यमाने माहिती प्रसिध्दी/प्रसार करण्याचे हेतुने कार्यक्रम हाती घेणे.

viii) निसर्ग पर्यटनाशी संबधित परिसंवाद, संमेलन, मेळावे व प्रदर्शनीचे आयोजन करणे तसेच अन्य यंत्रणाव्दारे आयोजित केलेल्या अशा प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होणे.

ix) आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित होणा-या निसर्ग पर्यटनासंबधी कार्यक्रमात भाग घेण्याकरिता संबधित आंतरराष्ट्रीय संस्थेची सदस्यता प्राप्त करणे.

x) निसर्ग पर्यटनास चालना देणे व स्थानिक लोकांना आर्थिक लाभ मिळेल या हेतूने कार्यवाही करणे.

xi) निसर्ग पर्यटनास चालना देत असतांना भारतीय वन अधिनियम १९२७, वनसंवर्धन अधिनियम १९८०, वन्यजीव (संरक्षण)अधिनियम १९७२, जैवविविधता कायदा २००२, पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व इतर अस्तित्वात असलेले अधिनियम व नियम तसेच मार्गदर्शक सूचनांचे उल्लघंन होणार नाही याबाबत पर्यटकांना माहिती देण्याची समुचित व्यवस्था करणे.

## ३. मंडळाची संरचना :-

मंडळाची रचना खालील प्रमाणे असेल :-

अ) नियामक मंडळ

ब) कार्यकारी समिती

क) नियामक मंडळाने स्थापित केलेल्या इतर समित्या.

ड) राज्यातील सर्व मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव) व वनविकास महामंडळाचे सर्व प्रादेशिक व्यवस्थापक हे मंडळाचे पदसिध्द महाप्रबंधक असतील आणि सर्व उपवनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव) तसेच सर्व विभागीय व्यवस्थापक हे मंडळाचे पदसिध्द उपमहाप्रबंधक असतील.

## ४. मंडळाचे सदस्यत्व :-

मंडळाचे दोन प्रकारचे सदस्य असतील:-

१) पदसिध्द सदस्य २) नामनिर्देशीत सदस्य

अ) मंडळाचे अध्यक्ष नामनिर्देशित अशासकीय सदस्यांची नियुक्ती करतील व नामनिर्देशित अशासकीय सदस्यांना पदावरून दूर करू शकतील किंवा त्यांचा राजीनामा स्वीकारतील.

ब) मंडळाचे सदस्यांना सदस्यत्व फी अनुज्ञेय राहणार नाही.

क) नियामक मंडळाची रचना व कार्यकारी समितीची रचना कलम ५ व कलम ११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

नियामक मंडळ, त्याचे कामकाज चालविण्यासाठी त्यास योग्य व समुचीत वाटेल अशारितीने नियामक मंडळ व कार्यसमितीच्या सदस्य संख्येत वाढ करू शकेल.

## ५. नियामक मंडळाची रचना

नियामक मंडळाची रचना खालील प्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १. मंत्री (वने) महाराष्ट्र शासन | : | अध्यक्ष |
| २. * सचिव (वने) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | : | सदस्य |
| ३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपुर | : | सदस्य |
| ४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर | : | सदस्य |
| ५. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि., नागपूर | : | सदस्य |
| ६. * अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ७. * अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ८. * सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ९. * प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| १०.* प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा प्रतिनिधी | : | सदस्य |
| ११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई किंवा प्रतिनिधी | : | सदस्य |
| १२. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| १३. संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | सदस्य |
| १४. महाराष्ट्र जैवविविधता मंडळाचे सदस्य-सचिव | : | सदस्य |
| १५. मुख्य वनसंरक्षक (कांदळवन), मुंबई | : | सदस्य |
| १६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | : | सदस्य |
| १७. ** व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक - एक चक्रीय पध्दतीने | : | सदस्य |
| १८. ** व्याघ्र प्रकल्पांच्या स्थानिक सल्लागार समितीतील स्थानिक लोकांचे प्रतिनिधी -एक | : | सदस्य |
| १९. ** हॉटेल संघटनेचा प्रतिनिधी - एक | : | सदस्य |
| २०. ** ट्रॅव्हल संघटनेचा प्रतिनिधी - एक | : | सदस्य |
| २१. ** निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे तज्ञ/संस्था-एक | : | सदस्य |
| २२. व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ | : | सदस्य सचिव |

**स्पष्टीकरण**

१. * महाराष्ट्र शासनाचे नियोजन, वित्त, पर्यटन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व आदिवासी विकास या प्रशासकिय विभागाचे प्रमुख पदसिध्द सदस्य असतील.

२. ** कार्यकारी समितीच्या शिफारसीनुसार किंवा हॉटेल संघटना/ट्रॅव्हल संघटना/स्थानिक सल्लागार समितीतील लोकांचे प्रतिनिधी निसर्ग पर्यटन क्षेत्रातील तज्ञ यांना नियामक मंडळाचे अध्यक्ष नामनिर्देशित करतील.

**६. मंडळाच्या सदस्यांना पदावरून दूर करणे** :-

मंडळाच्या मते, जी व्यक्ती अथवा सदस्य खालीलप्रमाणे आहे त्यास मंडळातून काढून टाकण्याचे अधिकार मंडळास राहील:-

अ) जी व्यक्ती दिवाळखोर म्हणून ठरविलेली आहे.

ब) ज्या व्यक्तीस नैतिक अध:पतनाच्या गुन्हयाबाबत शिक्षा झाली आहे.

क) सदस्य म्हणून काम करण्यास शारिरिक व मानसिक दृष्टया असमर्थ झाली आहे.

ड) ज्या व्यक्तीने अधिकाराचा इतका गैरवापर केला आहे की तिचा सदस्य म्हणून सहभाग चालू ठेवणे सार्वजनिक हिताचे विरूध्द होणार आहे.

इ) सदस्य म्हणून कार्य करणे अन्यायकारक ठरेल अशा प्रकारचे आर्थिक व अन्य लाभ मिळविलेली व्यक्ती.

**७. <u>मंडळाचे सदस्यांचा पदावधी</u> :-**

मंडळाचे नामनिर्देशित अशासकीय सदस्य यांचे नामनिर्देशनाच्या दिनांकापासून २ वर्ष इतका राहील.

**८. <u>मंडळाचे सदस्यांचा राजीनामा:-</u>**

मंडळाचे नामनिर्देशित सदस्य यांनी आपल्या स्वहस्ताक्षरात मंडळाचे अध्यक्षाला उद्देशून लिहीलेले राजीनामा पत्र मंडळाच्या कार्यालयात सादर करून कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा करु शकतील आणि अध्यक्षांनी राजीनामा स्विकारेपर्यंत सदस्यता चालू राहील.

**९. <u>नियामक मंडळाचे कार्य, अधिकार व जबाबदारी</u> :-**

अ) मंडळाचे कार्य पार पाडण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती तयार करणे.

ब) मंडळाचे वार्षिक अर्थसंकल्प व वार्षिक अहवालास मंजूरी देणे.

क) मंडळाचे वार्षिक लेखा परिक्षणास मान्यता देणे.

ड) कार्यकारी समितीचे कार्य उपविधीच्या तरतूदीनुसार कार्यक्षमतेने चालू आहेत, यावर देखरेख ठेवणे.

ई) मंडळाच्या उपविधीमध्ये सुधारणास मान्यता देणे.

फ) मंडळाच्या कर्मचा-यांना लागू असलेल्या सेवा शर्ती नुसार वेतन, भत्ते व इतर सोयी-सवलतींना मान्यता देणे.

ज) मंडळाचे आकस्मिक निधी चालविणे करिता कार्यपध्दतीला मान्यता देणे व अनपेक्षित खर्चास मंजूरी देणे.

ह) मंडळाचे प्रशासकीय संरचनेला मान्यता देणे.

## १०. नियामक मंडळाची बैठक:-

१. नियामक मंडळाची बैठक वर्षात किमान १ वेळ मंडळाच्या मुख्यालयात किंवा अध्यक्षाकडून ठरविण्यात येईल अशा ठिकाणी होईल.

२. मंडळाच्या ६ पेक्षा कमी नसलेल्या सदस्यांनी लेखी विनंती केल्यावर किंवा राज्य शासनाने निर्देश दिल्यावर अध्यक्ष मंडळाची विशेष बैठक बोलावतील.

३. बैठकीचे प्रयोजन, वेळ आणि ठिकाण तसेच विनिर्दिष्ट करणारी सर्वसाधारण बैठकीची नोटिस किमान १५ दिवस अगोदर आणि विशेष बैठकीची नोटीस ३ दिवस अगोदर सदस्यांना देण्यात येईल.

४. प्रत्येक बैठकीचे अध्यक्षपद मंडळाचे अध्यक्ष भूषवतील आणि त्यांच्या अनुपस्थितीत, उपस्थित असलेले शासकीय सदस्यातून वरिष्ठतम अधिकारी अध्यक्ष राहील.

५. मंडळाचे निर्णय उपस्थित असलेल्या आणि मतदान करू शकणा-या सदस्यांच्या साध्या बहुमतांने घेण्यात येईल,आणि अध्यक्षाला निर्णायक मत असेल.

६. प्रत्येक सदस्याला १ मत असेल.

७. मंडळाच्या बैठकीची गणपूर्ती ८ सदस्यांनी होईल. त्यात किमान २ अशासकीय सदस्य उपस्थित राहणे अनिवार्य ठरेल.

८. मंडळाच्या बैठकीकरिता नोंदवही ठेवण्यात येईल व त्यात बैठकीत उपस्थित सदस्यांची स्वाक्षरी घेण्यात येईल तसेच बैठकीचा कार्यवृत्तांत नोंद करण्यात येईल. अध्यक्षांची मान्यता मिळाल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक बैठकीचा कार्यवृत्तांत सही निशी संबधितांना पाठवतील.

९. मंडळाच्या सर्वसाधारण सभेच्या मान्य कार्यवृत्तांत व्यवस्थापकीय संचालक यांनी १५ दिवसाचे आंत निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे पाठवावा.

## ११. कार्यकारी समिती :-

कार्यकारी समितीची रचना खालील प्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर | : | अध्यक्ष |
| २. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर | : | सदस्य |
| ३. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि., नागपूर यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ वा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) महाराष्ट्र राज्य, नागपूर | : | सदस्य |
| ६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपूर | : | सदस्य |
| ७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर | : | सदस्य |
| ८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई | : | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९. निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थाचे प्रतिनिधी/ वास्तुशास्त्रज्ञ / विशेषज्ञ / तज्ञ - प्रत्येकी एक | : | सदस्य |
| १०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ | : | सदस्य सचिव |

## १२. कार्यकारी समितीचे कार्य व अधिकार :-

निसर्ग पर्यटन धोरण आणि मंडळाने ठरवून दिलेले उद्धिष्ट साध्य करण्याकरिता कार्यक्रमाची अंमलबजावणीस संबंधीत कार्यकारी समिती जबाबदार राहील. नियामक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक किंवा इतर मंडळाचे अधिकारी यांना सोपविलेले शक्तीचे प्रत्यायोजन खेरीज मंडळाचे सर्व अधिकार विहीत असतील. कार्यकारी समिती पुढील प्रमाणे कार्य पार पाडेल:-

१) मंडळाचे वार्षिक कार्य-आयोजनेस मान्यता देणे
२) निसर्ग पर्यटन विकास प्रकल्पांना मान्यता देणे
३) नियामक मंडळापुढे ठेवण्याआधी, वार्षिक अर्थसंकल्पीय लेखा परीक्षण अहवाल व इतर महत्वाचे प्रस्तावावर विचार करणे व मान्यता देणे.
४) मंडळाचे उपविधी मंजुरी/सुधारणा करिता नियामक मंडळ समोर मांडणे
५) मंडळाच्या कर्मचा-यांच्या सेवेच्या अटी व शर्ती तयार करणे
६) मंडळाचे कार्यक्रमाची अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे
७) मंडळाचे कार्यक्रमाची अंमलबजावणी करिता व्यवस्थापकीय संचालक किंवा मंडळाच्या इतर अधिकारी यांना शक्तीचे प्रत्यायोजन करणे.
८) नियामक मंडळाचे निर्देशानुसार कार्य पार पाडणे.
९) मंडळाचे लेखा परिक्षणाकरिता लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे.
१०) मंडळाचे आदेश, निर्देश किंवा धोरण विषयक निर्णय यांच्या अंमलबजावणीच्या संबधात विवाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेणे
११) मंडळाचे कर्मचा-यांचे कल्याणाकरिता उपाययोजना संबंधी निर्णय घेणे.

## १३. मंडळाचे अधिकारी/ कर्मचारी :-

मंडळाचे कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मंडळात व्यवस्थापकीय संचालक राहील व गरज वाटेल तितक्या अधिका-यांची व ईतर कर्मचा-याची नियुक्ती करता येईल. मंडळाची प्रशासकीय संरचना खालीलप्रमाणे राहील:-

### अ) व्यवस्थापकीय संचालक :-

१) राज्य शासन प्रतिनियुक्तीवर व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती करेल.
२) व्यवस्थापकीय संचालक भारतीय वनसेवेतील राज्य संवर्गाचा मुख्य वन संरक्षक अथवा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक दर्जाचा अधिकारी असेल.

**ब)** **<u>महाप्रबंधक</u> :-**

१) राज्य शासनाच्या प्रतिनियुक्तीवर महाप्रबंधक यांची नियुक्ती होईल.

२) महाप्रबंधक भारतीय वनसेवेतील राज्य संवर्गाचा मुख्य वनसंरक्षक अथवा वनसंरक्षक दर्जाच्या अधिकारी असेल.

**क)** **<u>उप महाप्रबंधक:-</u>**

१) राज्य शासन प्रतिनियुक्तीवर सहायक महाप्रबंधक यांची नियुक्ती करेल

२) उप महाप्रबंधक भारतीय वनसेवेतील/ राज्य वनसेवेतील उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी दर्जाचा अधिकारी असेल.

**ड)** मंडळाचे कार्य सुरळीतपणे चालविण्याकरिता आवश्यक कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर नियुक्त करण्यात येतील.

**१४.** **<u>व्यवस्थापकीय संचालक यांची जबाबदारी</u> :-**

i) व्यवस्थापकीय संचालक हे मंडळाचे दैनंदिन प्रशासकीय व व्यवस्थापकीय कामांकरिता जबाबदार असतील.

ii) मंडळाने घ्यावयाचे सर्व आदेश किंवा सूचना व्यवस्थापकीय संचालक यांच्या सहीने दिलेल्या असतील.

iii) व्यवस्थापकीय संचालक हे मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तांत व ईतर अभिलेखाकरिता नोंदवही ठेवतील.

iv) व्यवस्थापकीय संचालक ही अशी व्यक्ती असणार ज्यांच्या नांवाने प्रसंगानुरुप त्यांचे विरूध्द अथवा त्यांच्या वतीने वाद दाखल करण्यात येईल.

v) मंडळाचे वतीने व्यवस्थापकीय संचालक मंडळाची निधी उभारणी करिता देणगी, चल व अचल मालमत्ता, इतर रितसर स्त्रोतातून प्राप्त झालेली रक्कम संपूर्ण अधिकारासह स्विकारतील.

vi) व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्या कार्याच्या अंमलबजावणी करिता मंडळाच्या निधीचा वापर व नियंत्रण करतील.

vii) व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्या वार्षिक अहवाल, आराखडा, आर्थिक अहवाल,वित्तीय अंदाजपत्रक व अर्थसंकल्प,आस्थापना अहवाल तयार करतील.

viii) व्यवस्थापकीय संचालक कार्यकारी समितीकडून त्यांना सोपविण्यात आलेल्या अधिकाराचा वापर अन्य कामे पार पाडतील.

ix) मंडळाचे वतीने व्यवस्थापकीय संचालक हे आवश्यक त्या कार्यासाठी करार करतील.

x) मंडळाने दिलेल्या सेवेकरिता फी ची आकारणी करणे व वसूली करण्याचे कार्य व्यवस्थापकीय संचालक पार पाडतील.

xi) मंडळाचे आकस्मिक निधी करिता नियम तयार करण्याचे व कार्यकारी समितीकडून मान्यता घेण्याचे कार्य व्यवस्थापकीय संचालक करतील.

**१५. व्यवस्थापकीय संचालक चे कार्य व अधिकार :-**

१. व्यवस्थापकीय संचालक हे नियामक मंडळ व कार्यकारी समितीने प्राधिकृत केलेल्या अधिकारांची वहन करतील.

२. मंडळाचे अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या सेवाशर्ती व अटीनुसार वेतन व इतर भत्ते निश्चित करणे व वितरण करणे करिता व्यवस्थापकीय संचालक हे सक्षम प्राधिकारी असेल.

**१६. मंडळाचे कर्मचा-यांची नियुक्ती :-**

१. मंडळाचे कर्मचारी प्रतिनियुक्ती/कंत्राटी पध्दतीवर नियुक्त करण्यात येतील.

२. मंडळाचे सर्व अधिकारी/ कर्मचारी व्यवस्थापकीय संचालक यांचे नियंत्रणाखाली कार्य करतील.

**१७. मंडळाचे अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवाशर्ती व अटी :-**

१. मंडळाने पारित केलेल्या नियमानुसार कर्मचा-यांना सेवाशर्ती व अटी लागू असतील तसेच पारिश्रमिक अदा करण्यात येईल.

२. राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीव्दारे नियुक्त केलेल्या अधिका-यांच्या बाबतीत सेवा अटी व शर्ती त्यांचे मूळ सेवेचे नियमानुसार असतील.

**१८. अधिकारी/ कर्मचा-यांची सर्वसाधारण अनर्हता :-**

ज्या व्यक्तीचा व्यक्तीशः अथवा भागीदार मार्फत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मंडळाचे कार्यभारात हितसंबध असेल किंवा मंडळाचे सेवेत असेल ती व्यक्ती मंडळाचे सेवेत नियुक्ती करिता अथवा मंडळाची सेवा सुरू ठेवण्यास अपात्र राहील.

**१९. कार्यकारी / अंमलबजावणी यंत्रणा :-**

कार्यकारी समितीव्दारे मंजुर अटी व शर्ती ला अनुसरून मंडळाचे कार्याची अंमलबजावणी सर्वसाधारण वनविभाग / वन विकास महामंडळाचे क्षेत्रीय घटकांमार्फत करण्यात येईल. तथापि, आवश्यक वाटेल तेव्हा कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार मंडळाचे कार्याची अंमलबजावणी इतर यंत्रणा उदा. पर्यटन विभाग, केंद्र/राज्य शासनाचे विभाग/ उपक्रम, वनसंरक्षण समिती/ परिस्थीतीकिय विकास समिती/स्थानिक स्वराज्य संस्था/बी.डी.सी./बचत गट/ आत्म सहाय्य गट ई. मार्फत करता येईल.

**२०. निसर्ग पर्यटन विकास मंडळ निधी :-**

केंद्र शासन/राज्य शासनाचे अनुदान अथवा आर्थिक सहाय्य तसेच कंपनी/ संस्था किंवा व्यक्ती कडुन देगणी स्वीकारू शकेल. मंडळाचे उपविधी मधील तरतुदीनुसार मंडळाचे संपत्तीची विक्री, भाडे, कर, व्याज नफा व ईतर मार्गाने प्राप्त निधी व मंडळास प्राप्त अनुदान इतर सर्व मिळून मंडळाचा निधी असेल.

अ) खालील प्रमाणे मंडळाचे निधी असतील.

**१) सर्वसाधारण निधी (General fund)-**

सदर निधीचा वापर मुख्यत: मंडळाचे प्रशासकीय खर्च भागविण्याकरिता उपयोग होईल. तथापि, निधीचा काही भाग मंडळाचे निणर्यानुसार प्रकाष्ट निधीत वळती करण्याची मुभा राहील. मंडळाकडून विर्निदिष्ट केलेल्या खालील स्त्रोताकडुन निधी उभारता येईल:-

१) केंद्र/राज्य शासनाकडुन राबविण्यात येणा-या विविध योजना अंतर्गत निसर्ग पर्यटनासाठी उपलब्ध होणारे वार्षिक अनुदान.

२) संरक्षित क्षेत्राचे विकास निधीतून विर्निदिष्ट रक्कम (किमान १० टक्के).

३) महाराष्ट्र वनविभागाचे तसेच वनविकास महामंडळाचे विकास निधीतून विर्निदिष्ट रक्कम (किमान १० टक्के)

४) राज्य पर्यटन, ग्रामीण विकास, क्रिडा विभाग कडून प्राप्त अंशदान.

५) केंद्र/राज्य शासन व त्यांचे उपक्रम तसेच स्थानिक संस्था यांचेकडून प्राप्त अनुदान कर्जे.

६) मंडळाचे विविध प्रकल्पाकरिता प्राप्त निधीतील बचत

७) मंडळामार्फत राबविण्यात येणारे इतर विभागाचे/यंत्रणेचे प्रकल्प संबधी देखरेख फी आकारणी.

**२) प्रकल्प निधी (Project fund):-**

निसर्ग पर्यटन प्रकल्प राबविण्याकरिता मंडळाला प्राप्त निधीचा समावेश असेल.

**३) कर्ज निवारण निधीची स्थापना व त्याचे व्यवस्थापन:-**

मंडळाने घेतलेले कर्जाची परतफेड करिता मंडळ कर्जनिवारण निधीची स्थापना करेल व जोपर्यत संपूर्ण कर्जाची परतफेड पूर्ण होणार नाही तोपर्यंत सदर निधीत दरवर्षी पूर्वनिश्चित/आवश्यक प्रमाणात निधी जमा करेल.

**४) मंडळाचा आकस्मिकता निधी (Contingency fund):-**

१) मंडळ आकस्मिकता निधीची स्थापन करेल व ठोक रकमेचा सदर निधीत अंशदान करेल.

२) सदर निधी व्यवस्थापकीय संचालक यांच्या ताब्यात असेल व सदर निधीचा वापर अनपेक्षित खर्च भागविण्याकरिता मंडळाने ठरवून दिलेल्या तरतुदीनुसार करण्यात येईल. इतर कामाकरिता सदर निधीचा वापर करता येणार नाही.

३) आकस्मिकता निधीचा वापर करणे संबधी मंडळ नियम तयार करेल.

४) मंडळाचा बँक लेखा - राज्य शासनाचे निर्णयाखेरीज मंडळाचे खाते भारतीय स्टेट बँक अथवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत उघडता येईल. मंडळाचे बँक खाते व्यवस्थापकीय संचालक अथवा त्यांनी अधिकृत केलेला अधिकारी हाताळेल.

**२१. कर्ज घेणे व कर्ज देणेबाबत अधिकार :-**

या उपविधीच्या तरतूदीच्या अधिन राहून व राज्य शासनाचे पूर्व परवानगी घेऊन मंडळ, आवश्यकतेनुसार मंडळाचे काम चालविण्याकरिता सार्वजनिक वाणिज्यीक संस्था अथवा केंद्र/राज्य शासनाव्दारे नियंत्रीत वाणिज्यीक संस्था/निगम कडून कर्ज घेऊ शकेल व देऊ शकेल.

**२२. राज्य शासनाची हमी :-**

मंडळाने घेतलेल्या कर्जाची परतफेड करिता मंडळाचे विनंतीनुसार व आवश्यक वाटेल त्या अटीनुसार राज्य शासन हमी घेईल.

**२३. मंडळाचा लेखा व परीक्षण:-**

१) व्यवस्थापकीय संचालक नियमातील तरतुदीनुसार निधीचा हिशोब ठेवण्याकरिता नोंदवही ठेवेल व वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखा विवरण पत्र तयार करेल.

२) व्यवस्थापकीय संचालक मंडळाचा निधीचा हिशोबाचा वार्षिक लेखा परिक्षण करवून घेईल.

३) वार्षिक लेखा परिक्षण झाल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक लेखा परीक्षण केलेल्या हिशोबाची प्रत, लेखा परीक्षणाचे अहवालासह मंडळापुढे सादर करेल.

४) लेखा परीक्षणाचे अहवालावर मंडळ अथवा कार्यसमितीने दिलेल्या निर्देशानुसार व्यवस्थापकीय संचालक आवश्यक पूर्तता कार्यवाही करेल.

५) व्यवस्थापकीय संचालक, लेखा परिक्षण अहवाल, निबंधक, संस्थाचे नोंदणी अधिनियम १८६० चे कलम क्र १२ E नुसार सादर करतील.

**२४. अहवाल :-**

मंडळ त्यांचा कार्याचा तपशीलवार हिशोब देणारा प्रत्येक वित्तीय वर्षाचा अहवाल आणि वार्षिक लेखा विवरण पत्र विहीत तारखेपूर्वी राज्य शासनास सादर करेल.

**२५. मंडळाचे अधिक्रमण-**

**अ) मंडळ/ कार्यकारी समितीचे अधिक्रमण झाल्याचे परिस्थितीत**

१) मंडळाचे अधिक्रमण बाबत अधिसूचना प्रकाशित झाल्यापासून मंडळाचे अध्यक्ष व सदस्य पदावरून कमी होतील.

२) कायद्यातील तरतुदीनुसार मंडळाचे अध्यक्षास असलेले सर्व अधिकार व कर्तव्य सदर कालावधीत संपुष्टात येतील. व राज्य शासनांने नियुक्त केलेल्या अधिकारी/प्राधिकरण यास निहीत होईल.

३) मंडळाचा निधी, व संपत्ती अधिक्रमण कालावधीत परिच्छेद २५(२) मध्ये नमूद अधिकारी/ प्राधिकरण यास निहीत असेल.

**ब) अधिक्रमणाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर राज्य शासन**

i) आवश्यकतेनुसार अधिक्रमण कालावधीची मुदत वाढवेल.
ii) मंडळाची पुनर्रचना करेल.

**२६. मंडळाचे विसर्जन :-**

संस्थाचे नोंदणी अधिनियम १८६० वे कलम १३ मधील तरतुदीनुसार उक्त कारणास्तव अथवा मंडळाची नोंदणी रदद झाल्याचे स्थितीत मंडळाचे विसर्जन होईल. त्या परिस्थितीत मंडळाची सर्व संपत्ती, निधी व परतफेड राज्य शासनास निहीत होईल.

**२७. मंडळाचे नियम करण्याचे अधिकार:-**

अ) या उपविधीच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी मंडळ अधिमंडळाच्या २/३ बहुमंताने मंडळ अधिकृत रित्या प्रसिध्दी करून नियम तयार करू शकते अथवा नियमात सुधारणा करू शकते.

ब) विशेष करून, आणि पूर्वीच्या दिलेल्या अधिकारांच्या सर्वसामान्यतेला बाधा न आणता खालील सर्व किंवा एखाद्या बाबी साठी नियम करू शकते.

i. कलम ४(अ) खाली अध्यक्षाचे अधिकार व कर्तव्य.
ii. कलम ११ खाली कार्यकारी समितीचे सदस्यांची नियुक्ती.
iii. कलम १० खाली सभेचे काम चालविणेबाबत पध्दती.
iv. पदाची निर्मिती व मंडळाच्या शक्तीचे प्रत्यायोजन संबंधी.
v. मंडळाचे अधिकारी /कर्मचारी यांचा सेवाशर्ती व अटीबाबत
vi. मंडळाचे कामकाज प्रभावीपणे चालविण्यासंबधी
vii. इतर कोणताही विषय जो विहीत केला जायचा आहे किंवा केला जाईल किंवा ज्याबाबत
viii. नियमाव्दारे तरतूद करणेंची आहे.

**२८. वाद :-**

i. सर्व कायदेशीर बाबी नागपूर स्थित न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात असतील.
ii. मंडळाचे आदेश किंवा धोरण विषयक निर्णय यांचा अंमलबजावणीच्या संबंधात वाद निर्माण झाल्यास, मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

******